# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः19.06.2024** **वारःबुधवार**

---

१.भारत जगातली तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्यात कृषी क्षेत्राचं योगदान मोलाचं असेल - पंतप्रधानांचं प्रतिपादन

२.नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहार आणि पेपरफुटीप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची एनटीए सह केंद्र सरकारला नोटीस

३.मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात भारतीय वन्यजीव माहितीपट आणि संवर्धनाचे प्रयत्न या विषयावर मार्गदर्शनसत्र

४.राज्य विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी निवडणुकीची घोषणा

आणि

५.सोलापूर जिल्ह्यातल्या अपघातात सहा मजूर महिलांचा मृत्यू

**किसान सन्माननिधी**

भारत जगातली तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्यात कृषी क्षेत्राचं योगदान मोलाचं असेल असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल उत्तर प्रदेशात वाराणसी इथं प्रधानमंत्री किसान सन्मान संमेलनात बोलत होते. शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्यासाठी केंद्र सरकार कटीबद्ध असून शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्याला सरकारचं प्राधान्य आहे असं त्यांनी सांगितलं.

पंतप्रधानांच्या हस्ते यावेळी देशातल्या ९ कोटी २६ लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना थेट लाभ हस्तांतरणाद्वारे किसान सन्मान निधीच्या १७ व्या हप्त्याचं वितरण करण्यात आलं. तसंच बचत गटाच्या महिलांना कृषी सखी प्रमाणपत्रं देण्यात आली.

शेतकऱ्यांचं उत्पादन वाढवणं आणि त्यांचा लागवडीवरचा खर्च कमी करणं तसंच योग्य आधारभूत किमतीद्वारे त्यांच्या शेतीमालाला चांगली किंमत मिळवून देणं हे सरकारचं उद्दीष्ट आहे असं केंद्रिय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी या कार्यक्रमात सांगितलं.

हिंगोली जिल्ह्यात तोंडापूर इथं केंद्रातील युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते या निधीचं वितरण करण्यात आलं. भविष्यातही शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यास शासन कटिबद्ध असेल असं रक्षा खडसे यांनी सांगितलं.

**रामदासआठवले**

यानिमित्त पुणे जिल्ह्यात नारायणगांव इथं किसान संमेलन आयोजित करण्यात आलं होतं. कृषी विज्ञान केंद्रातर्फे आयोजित प्रशिक्षणास सहभागी झालेल्या काही महिलांना यावेळी केंद्रिय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते कृषी सखी प्रमाणपत्र देण्यात आलं.

नंतर बातमीदारांशी बोलताना ते म्हणाले की कोणत्याही निवडणुकीत किमान ८० टक्के नागरिकांनी मतदानात सहभाग घेतला पाहिजे आणि त्यासाठी निवडणूक आयोगानं योग्य त्या उपाय योजना कराव्यात असं मत त्यांनी व्यक्त केलं . मतदानासाठी रांगेत तिष्ठत उभं राहावं लागतं आणि कदाचित त्यामुळं देखील अनेक मतदार मतदान प्रक्रियेकडे पाठ फिरवत असल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

**<u>नीट-सर्वोच्च न्यायालय</u>**

नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहार आणि पेपरफुटीप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं काल राष्ट्रीय परीक्षा संस्था अर्थात एनटीए सह केंद्र सरकारला नोटीस बजावली.

नीट परीक्षा प्रकरणी झालेल्या १ सहस्रांश टक्के चुकीकडेही गांभीर्यानं लक्ष देणं गरजेचं आहे. या कठीण समजल्या जाणाऱ्या वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या परिश्रमांकडे दुर्लक्ष करता येणार नाही असं मत न्यायालयानं नोंदवलं.

दरम्यान, नीट साठीच्या समुपदेशनाला स्थगिती देणार नसल्याचा पुनरुच्चार सर्वोच्च न्यायालयानं केला.

**<u>पंत प्रधान योगदिवस</u>**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त येत्या शुक्रवारी श्रीनगर इथं होणाऱ्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी होणार आहेत. केंद्रिय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी माध्यम प्रतिनिधींना काल नवी दिल्लीत ही माहिती दिली. योग स्वतःसाठी आणि समाजासाठी ही यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना आहे. या संकल्पनेतून व्यक्ती आणि समाजाचंही आरोग्य चांगलं राखण्यामध्ये  योगाभ्यासाच्या महत्त्वावर भर देण्यात आला आहे असं जाधव यांनी सांगितलं.

दृष्टीबाधित व्यक्तींना सुलभतेनं योग शिकून त्याचा सराव करता यावा यासाठी योगाभ्यासाची सर्वसाधारण नियमावली सांगणारं पुस्तक ब्रेल लिपीत छापण्यात आलं आहे. त्याचं प्रकाशन या कार्यक्रमात आयुष मंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं.  लहान मुलांना मनोरंजनातून योग शिकवणाऱ्या प्रोफेसर आयुष्मान या सचित्र नियतकालिकाचंही यावेळी प्रकाशन करण्यात आलं.

**<u>पंतप्रधानपत्र</u>**

दरम्यान, सर्व ग्राम पंचायतींच्या सरपंचांनी योग आणि भरडधान्याविषयी जनजागृती करुन चांगलं आरोग्य ही लोकचळवळ बनवावी असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पंचायतींच्या आवारात तसंच शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र यासारख्या ठिकाणी योग शिकवणारे कार्यक्रम आयोजित करावेत असं पंतप्रधानांनी सर्व सरपंचांना उद्देशून लिहीलेल्या पत्रात म्हटलं आहे.  शरीर आणि मनाच्या आरोग्यासाठी योगाभ्यास आवश्यक आहे तसंच चांगल्या पोषणासाठी श्री अन्न म्हणजेच भरडधान्याचा आहारात समावेश महत्त्वाचा आहे असं पंतप्रधानांनी या पत्रात नमूद केलं आहे.

**<u>मिफ</u>**

इंट्रो - १८वा मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात मिफचा कालचा चौथा दिवसही विविध चित्रपटांचं प्रदर्शन, संबंधित विषयांवरची चर्चासत्रं आणि मार्गदर्शनसत्रं, तसंच परिसंवादांनी गाजला. याविषयीचा अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून...

**<u>स्क्रिप्ट</u>** –

भारतीय वन्यजीव माहितीपट आणि संवर्धनाचे प्रयत्न या विषयावर अल्फोन्स रॉय यांचं मार्गदर्शनसत्र काल मिफमध्ये झालं. ॲनिमेशनपटांचा प्रवास आणि तरुण आणि मध्यमवयीनांना पडलेली ॲनिमेशनपटांची भुरळ यावर मुंजल श्रॉफ आणि केतन मेहता यांनी आपापले विचार मांडले. चरित्रात्मक माहितीपट आणि चरित्रपट यांच्यातला फरक राहुल रवैल आणि रॉबिन भट्ट यांनी उलगडून दाखवला. व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार विजेते वन्यजीव चित्रपट निर्माते सुब्बय्या नल्लमुत्थू आणि द कमांडंट्स शो या चित्रपटाच्या दिग्दर्शक डॅनिएला वोल्कर यांनी वार्ताहरांशी संवाद साधला. द कमांडंट्स शो या चित्रपटाच्या चमूने काल रेड कार्पेटवरही हजेरी लावली. विख्यात ॲनिमेटर जॉर्ज श्वित्झगेबेल यांनी ॲनिमेशनचा मास्टरक्लास घेतला. याशिवाय राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेतले, बेबेल्सबर्ग चित्रपट संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेले विविध माहितीपट, लघुपट आणि ॲनिमेशनपटांचा आनंद चित्रपटप्रेमींनी लुटला. आकाशवाणी बातम्यांसाठी, अंकिता आपटे, मुंबई.

**<u>विधानपरिषद</u>**

राज्य विधानपरिषदेच्या रिक्त होणाऱ्या ११ जागांसाठी निवडणुकीची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगानं काल केली. येत्या १२ जुलैला निवडणूक होणार असून त्याच दिवशी मतमोजणी देखील होणार आहे. विधानसभेच्या आमदारांकडून या सदस्यांची निवड होणार आहे. निवडणुकीची अधिसूचना २५ जूनला जारी होणार असून २ जुलैपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. ३ जुलैला अर्जांची छानननी होऊन ५ जुलैपर्यंत अर्ज मागे घेता येतील.

मनीषा कायंदे, विजय गिरकर, अब्दुल्ला दुर्राणी, निलय नाईक, अनिल परब, रमेश पाटील, रामराव पाटील, वजाहत मिर्झा, प्रज्ञा सातव, महादेव जानकर आणि शेकापचे जयंत पाटील यांचा कार्यकाळ २७ जुलै रोजी पूर्ण होत असल्यानं ही निवडणूक होणार आहे.

**<u>प्रधानमंत्रीविमा</u>**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत राज्यातल्या या वर्षीच्या खरीप हंगामासाठी पीक विमा भरण्यास कालपासून सुरुवात झाली. या वर्षीही अधिसुचित पिकांचा विमा भरण्यासाठी शेतकऱ्यांना फक्त एक रुपया भरावा लागणार असल्याची माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. शेतकऱ्यांनी खरीप पीकविमा पंधरा जुलैपुर्वी भरावा असे आवाहन मुंडे यांनी केलं. योजनेतल्या १४ पिकांसाठी अधिसुचित क्षेत्रातले पीक कर्ज घेणारे आणि कर्ज न घेतलेलेही शेतकरी या योजनेत ऐच्छिक सहभाग घेऊ शकतात.

**<u>लातूरमिलेट</u>**

लातूर जिल्ह्यात 200 हेक्टर क्षेत्रावर भरडधान्य अर्थात मिलेटची पेरणी करण्यात येणार आहे. त्याचा प्रारंभ औसा तालुक्यातल्या लोदगा इथं जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते पेरणी करुन झाला. जिल्ह्यात जास्तीत जास्त क्षेत्रावर भरडधान्यांच्या पेरणीसाठी कृषि विभागाने प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

**<u>गणात्रा</u>**

जागतिक स्तरावरील विख्यात चित्रपट निर्माते विनोद गणात्रा यांना दक्षिण अफ्रिकेचा प्रतिष्ठित नेल्सन मंडेला जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार मिळवणारे ते पहिलेच भारतीय ठरले आहेत. मुलांसाठीच्या चित्रपटजगतात त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल हा गौरव करण्यात आला. गणात्रा यांनी ३६ राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार पटकावले आहेत. त्यांनी चारशेहून अधिक माहितीपटांसह २५ बहुभाषिक कार्यक्रमही निर्माण केले आहेत.

**<u>आरोग्य उपाययोजना</u>**

सार्वजनिक आरोग्य विभागानं पावसाळ्यातल्या जलजन्य आणि कीटकजन्य आजारांवरील उपाययोजनांबाबतची मार्गदर्शक तत्त्वं जारी केली आहेत. यासंदर्भात स्थानिक स्वराज्य संस्थांना पत्र पाठवल्याची माहिती पुणे आरोग्य विभागाचे सहसंचालक डॉक्टर राधाकिशन पवार यांनी दिली आहे. जलस्रोतांचं प्रभावी गुणवत्ता नियंत्रण करण्याच्या सूचना सर्व जिल्हयांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक गावाला हिरवं, पिवळं आणि लाल कार्ड दिलं जातं. यंदाही गावांचं काळजीपूर्वक सर्वेक्षण केलं जाणार असल्याचं पवार यांनी सांगितलं.

**<u>वृक्षारोपणमोहीम</u>**

धुळे जिल्ह्यात स्वच्छ भारत अभियान आणि माझी वसुंधरा अभियानाच्या अनुषंगानं ५० लाख वृक्ष लागवडीचा उपक्रम राबवण्यात येणार आहे. यासाठीची रोपं तयार करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात बियांचं वाटप करण्यात आलं. प्रशासनातर्फे महानगरपालिका, नगरपरिषदांच्या मोकळ्या जागेत वृक्षारोपण केलं जाणार आहे.

**<u>शक्तीपीठमार्ग</u>**

राज्यातल्या बारा जिल्ह्यातून जाणाऱ्या नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्गाला यवतमाळच्या शेतकऱ्यांनी समर्थन दिले असून हा महामार्ग लवकरात लवकर पूर्ण करावा, या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना पाठवलं आहे.

**<u>शक्तिमार्गविरोध</u>**

तर दुसरीकडे कोल्हापुरात मात्र या महामार्गाला विरोध करण्यासाठी महामोर्चा काढण्यात आला. सरकारनं या महामार्गाला तत्काळ स्थगिती न दिल्यास मंत्र्यांना कोल्हापूर बंदी करून पुणे-बेंगलोर महामार्ग आणि अन्य मार्ग रोखत टप्प्याटप्प्यानं आंदोलनाची तीव्रता वाढवली जाईल असा इशारा शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीनं दिला.

**<u>अपघातमृत्यू</u>**

सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर-कऱ्हाड रस्त्यावर भरधाव ट्रकनं रस्त्याकडेला उभ्या असलेल्या मजूर महिलांना उडवल्याची घटना काल दुपारी घडली. या अपघातात सहा महिला जागीच ठार झाल्या तर एक महिला गंभीर जखमी झाली आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.